**निशाणी ६९ वरील आदेशानुसार उलटतपास पुन्हा शपथेवर पुढे सुरु प्रतिवादीतर्फे ॲड. श्री पी. बी. यादव**

१३. दावा मिळकत हि वडिलोपार्जित मिळकत आहे. सन १९१२ मध्ये दावा मिळकतीचे क्षेत्रफळ अंदाजे २२ एकर होते. त्यामध्ये आमच्या आजोबा सोमा आणि गोमा यांचेमध्ये वाटप होउन त्या दोघांना प्रत्येकी ११ एकर क्षेत्र वाटुन दिले. सदरचे वाटप लेखी झाले किंवा तोंडी ते मी सांगु शकत नाही. सोमा व गोमा यांच्यातील वाटप कोणत्या वर्षी झाले ते मला आठवत नाही. त्यांच्यातील वाटप माझे जन्मापुर्वी झाले होते. माझा जन्म ३०.०९.१९३६ रोजी झाला. हे म्हणणे खरे आहे की, सोमा व गोमा यांच्यातील वाटप होण्यापुर्वी वडिलोपार्जित जमीनीचे क्षेत्रफळ २१ एकर २१ डेसिमल होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल व प्रतिवादींचे वडिल यांची शेती एकमेकास लागुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे शेती व प्रतिवादींची शेती याचेमधुन रामटेक ते तुमसर रस्ता गेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रस्ता करतांना माझे जमीनीतील काही क्षेत्र रस्त्यामध्ये गेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे जमीनीतील ७० डेसिमल जमीन रस्त्याकरीता संपादीत केली होती. आता मला निशाणी ८० सोबत अनुक्रमांक १० वर दाखल केलेला नकाशा दाखविला. तो आमच्या जमीनीचा नकाशा नाही. आता मला निशाणी ८० सोबत अनुक्रमांक ५ वर दाखल केलेला नकाशा दाखविला. तो आमच्या जमीनीचा नकाशा असून त्यातील २४६ नंबरची जमीन माझी आहे. तो **निशाणी ८१** वर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या नकाशात दाखवलेला सर्व्हे नं. २४५ व २९९ या जमीनी प्रतिवादींच्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या नकाशात दाखविलेला सर्व्हे नं. ३०० ची जागा माझी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर नकाशात दाखविलेला सर्व्हे नं. २४७ ची जागा माझी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नकाशामध्ये दाखविलेला सर्व्हे नं. २९९ व सर्व्हे नं २४५ यांच्यामध्ये दाखविलेली जागा हा रस्ता आहे. आता मला निशाणी ८० सोबत अनुक्रमांक ७ वर दाखल केलेला नकाशा दाखविला. तो आमच्या जमीनीचा नकाशा आहे. तो **निशाणी ८२** वर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नकाशात दाखविलेले सर्व्हे नं. ५०२, ५०३, ५०४, ५०५, ५०६ व ५०७ हे सध्या प्रतिवादींच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नकाशामध्ये सर्व्हे नं. ५०२, ५०३ व ५०४ च्या दक्षिणेला रस्ता दाखविलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे तो रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नकाशात दाखविलेला सर्व्हे नं. ५०८ हा माझे ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं. ५०८ ला तारेचे कुंपन आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर नकाशात दाखविलेला सर्व्हे नं. ५०२, ५०३, ५०४, ५०५, ५०६ व ५०७ यांना पुर्वी सर्व्हे नं. २४५ होता. सर्व्हे नं. ५०२, ५०३ व ५०७ हे माझे नावे लागल्याबद्दल प्रतिवादीने जिल्हा अधिक्षक, भुमिअभिलेख, नागपूर यांचेकडे अपिल केल्याचे मला माहित नाही. साक्षदार पुन्हा

सांगतो की, तसे अपिल केल्याचे मला आता आठवले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपिलामध्ये मी माझा जबाब दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, तेथे दिलेल्या जबाबामध्ये मी आमचा वाद न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे दिवाणी न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत सदर अपिलाची सुनावणी घेण्यात येउ नये असे म्हणणे सादर केले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी केलेले ते अपिल आजपर्यंत प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे नं. ५०२, ५०३ व ५०७ ची जमीन प्रतिवादींच्या मालकीची असून त्यावर पुर्वीपासून प्रतिवादी व त्यांचे पुर्व हक्कदारांचा ताबा आहे. आता मला भंडारबोडी येथील प.ह.नं.४३ चा बंदोबस्त खसरा दाखलविला. त्यातील सर्व्हे नं. १४६ बाबतची नोंद बरोबर आहे. तो **निशाणी ८३** वर आहे. आता मला निशाणी ८० सोबत अनुक्रमांक ६ वर दाखल केलेले जमीन एकत्रीकरणाचे पत्रक दाखविले. ते पत्रक बरोबर आहे किंवा चुकीचे हे मला माहित नाही. ती साक्षांकीत प्रत असल्याने त्यास **निशाणी ८४** देण्यात आला. निशाणी ८४ मधील नोंदी बरोबर आहे किंवा नाही ते मला सांगता येणार नाही. आता मला निशाणी ८० सोबत अनुक्रमांक ९ वर दाखल केलेली अधिकार अभिलेमख पंजी दाखविली. त्यातील मजकूर बरोबर आहे किंवा नाही ते मला माहित नाही. ती साक्षांकीत प्रत असल्याने त्यास **निशाणी ८५** देण्यात आला. प्रतिवादींची ७० डेसिमल जमीन रस्त्यात गेली किंवा नाही ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, रस्त्यात जमीन संपादीत केल्यानंतरही प्रतिवादींची एकूण जमीन ११ एकर २४ डेसिमल शिल्लक राहिली. हे म्हणणे खरे नाही की, गोमा याचे वारसांना वाटपानुसार १० एकर २ डेसिमल जमीनी मिळाली होती.

१४. प्रतिवादीचे वकीलांनी विनंती केल्यावरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत

(मा. ये. वाघ)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रामटेक

दिनांक : १२/०२/२०१९

## उलटतपास शपथेवर सुरु प्रतिवादीतर्फे ॲड.श्री पी.बी. यादव

१५. सर्व्हे नं. ५०२, ५०३, ५०७ व ५०८ याचे जुने सर्व्हे नंबर मला माहित आहे. त्या सर्व सर्व्हे नंबरचा जुना सर्व्हे नंबर १४६/२ होता. त्याचे एकूण क्षेत्र ४ हे. १६ आर होते. जुना सर्व्हे न. १४६/२ चा ७/१२ उतारा मी आजपर्यंत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं. ५०८ चे क्षेत्रफळ ४ हे. १० आर आहे. सर्व्हे नं. ५०८ हा माझे ताब्यात असतांना त्याचाही ताबा मिळण्याबाबत मी का मागणी केली याचे कारण मला सांगता येईल. साक्षदार सांगतो की, सर्व्हे नं. ५०८ ला मी कुंपण केले असले तरी सर्व्हे नं. ५०८ मधील काही क्षेत्र कुंपणाच्या बाहेर असु शकते म्हणुन मी तशी मागणी केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी मोजणी केली तेंव्हा सर्व्हे नं. ५०२, ५०३ व ५०७ हे प्रतिवादींच्या ताब्यात आढळले. सदरची मोजणी दिनांक १५.१०.२००१ रोजी करण्यात आली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं. ५०२, ५०३ व ५०७ वर पुर्वीपासून प्रतिवादींचा ताबा आहे. प्रतिवादींनी जानेवारी २००३ मध्ये दावा मिळकतीवर ताबा केल्याचे मी दाव्यात केलेले कथन बरोबर आहे. प्रतिवादींनी जबरदस्तीने कब्जा केल्याबाबत मी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिलेली नाही. जानेवारी २००३ मध्ये जबरदस्ती ताबा केल्यानंतर मी प्रतिवादींविरुध्द लगेच कारवाई केली नाही. साक्षदार सांगतो की प्रतिवादींनी आपण आपसात मिटवुन घेउ असे सांगितल्यामुळे मी लगेच कारवाई केली नाही. त्यानंतर आम्ही एकत्रीत मिटींग बोलावली होती परंतु प्रतिवादी त्या मिटींगमध्ये हजर राहिले नाही. सदरची मिटींग १९ एप्रिल २००३ रोजी ठरली होती. दिनांक १०.१२.२००२ रोजी आमची मिटींग ठरली होती किंवा नाही ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींबरोबर माझी मिटींग झाली त्यामध्ये प्रतिवादी हे मला 'आम्हाला मोजणी करायची आहे' असे म्हणाले. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.१२.२००२ रोजी झालेल्या मिटींगमध्ये प्रतिवादी नं. १ व २ यांनी त्यांनी केलेल्या मोजमापाच्या नक्कल प्रती काढून नकाशाप्रमाणे दावा मिळकतीचा ताबा देतील असे कबुल केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, जानेवारी, २००३ मध्ये प्रतिवादींनी जबरदस्ती दावा मिळकतीवर ताबा केला नाही म्हणुन मी त्यांचेविरुध्द पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं. ५०२ मध्ये प्रतिवादींचे घर आहे. साक्षदार सांगतो की, प्रतिवादींनी ते घर दावा दाखल झाल्यानंतर बांधले आहे. मी सर्व दावा मिळकतीची मोजणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १५.१०.२००१ मध्ये केलेल्या मोजणीमध्ये सर्व्हे नं. ५०८ ची मोजणी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, रिसर्व्हेच्या वेळी प्रतिवादी हाजर नसल्याने सर्व्हे नं. ५०२, ५०३ व ५०७ हे मी माझे नावे लावुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे नं. ५०२, ५०३ व ५०७ हे कधीही माझे मालकीचे नव्हते.

१६.		प्रतिवादी रामचंद्र सहारे यांनी  सर्व्हे नं. ५०२, ५०३ व ५०७ हे चुकीने माझे नावे लागले त्यामध्ये दुरुस्ती करावी याबाबत भुमिअभिलेख कार्यालयात अर्ज केल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, तालुका निरीक्षक भुमिअभिलेख यांनी  सर्व्हे नं. ५०२, ५०३ व ५०७ हे चुकीने माझे नावे लागल्याबाबत अहवाल दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात दावा चालु आहे त्यामुळे कोणतीही कार्यवाही करु नये असा अर्ज मी तालुका भुमिअभिलेख यांचेकडे दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी अर्ज दिल्यामुळे तालुका भुमिअभिलेख कार्यालय यांनी सदर प्रकरणात पुढील कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींविरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की,  सर्व्हे नं. ५०२, ५०३ व ५०७ हे प्रतिवादींच्या मालकीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास काही नाही

श्रवणोत्तर स्वीकृत

(मा. ये. वाघ)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रामटेक

दिनांक : १२/०३/२०१९